Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 23 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: २३ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

शासकीय कार्यालयं आणि विभागांमध्ये निवड झालेल्या ७१ हजारांहून अधिक उमेदवारांना पंतप्रधान नरेंद्र मोदी आज दूरदृश्य प्रणालीद्वारे नियुक्तीपत्र प्रदान करणार आहेत. हा रोजगार मेळावा देशभरात ४५ ठिकाणी आयोजित करण्यात आला असून, या माध्यमातून देशभरातून निवडलेले नवे उमेदवार गृह मंत्रालय, टपाल कार्यालय, उच्च शिक्षण विभाग, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग यांसारखी विविध मंत्रालयं तसंच विभागांमध्ये नियुक्त होतील.

पुण्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या उपस्थितीत रोजगार मेळावा होत असून, यावेळी ५०० जणांना नियुक्तीपत्रं प्रदान करण्यात येणार आहेत.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला कुवेत दौरा आटोपून काल भारतात परतले. त्यांच्या या भेटीत संरक्षण सहकार्यासह चार महत्त्वपूर्ण करार करण्यात आले. सर्वसमावेशक संरक्षण सहकार्य करारात द्विपक्षीय लष्करी सहकार्यासह, सांस्कृतिक, क्रिडा, सौर ऊर्जा क्षेत्रांचा यात समावेश आहे. भारत आणि कुवेत या दोन्ही देशांनी सीमेपलीकडच्या दहशतवादासह सर्व प्रकारच्या दहशतवादाचा एकमुखानं विरोध केला. दहशतवादाशी लढण्यासाठी दोन्ही देश सहकार्य वाढवतील, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं प्रसिद्ध केलेल्या संयुक्त निवेदनात म्हटलं आहे.

****

राष्ट्रीय शेतकरी दिनानिमित्त आज देशभर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. देशाची प्रगती आणि विकासामध्ये शेतकऱ्यांच महत्व आणि भागिदारी अधोरेखित करणं, अन्न सुरक्षा, शाश्वत ग्रामीण अर्थव्यवस्था आणि कृषी परंपरा जपण्यासाठी शेतकऱ्यांचं योगदान कसं महत्वाचं आहे, यासाठी आजचा दिवस साजरा केला जातो. शेतकऱ्यांची महत्त्वाची भूमिका ओळखून सरकारने त्यांच्या

सामाजिक-आर्थिक उन्नतीसाठी आणि शाश्वत कृषी विकासासाठी अनेक उपक्रम हाती घेतले आहेत. देशात यंदा विक्रमी ३३२ दशलक्ष टनापेक्षा जास्त अन्नधान्याचं उत्पादन झालं आहे.

****

शेती हा ग्रामीण विकासाचा कणा असून, जोपर्यंत ग्रामीण भागाचं चित्र बदलत नाही तोपर्यंत देश विकसित होऊ शकत नाही, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं चौधरी चरणसिंह पुरस्कार प्रदान सोहळ्यात ते काल बोलत होते. शेतकरी जेव्हा आत्मनिर्भर होईल तेव्हाच ग्रामीण भागाची अर्थव्यवस्था उभी राहु शकते, असं धनखड म्हणाले. यावेळी उपराष्ट्रपतींनी चौधरी चरणसिंह यांच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले, तसंच शेतकरी कल्याण, ग्रामीण विकास यासाठीच्या चरणसिंह यांच्या योगदानाचाही उल्लेख केला.

****

विमानानं प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी नागरी उड्डाण मंत्रालयानं विमान तळांवर 'उडान यात्री कॅफे' सुरू करण्याची घोषणा केली आहे. विमान तळांवर वाजवी दरात खाद्यपदार्थ आणि पाण्याची सोय होणार असल्यानं प्रवाशांसाठी हा मोठा दिलासा आहे. प्रायोगिक तत्वावर कोलकता विमान तळावर सुरू केलेला हा उपक्रम यशस्वी झाल्यानं देशात अन्य विमान तळांवर सुद्धा हा उपक्रम राबवला जाईल.

****

माहिती प्रसारण मंत्रालयाच्या अखत्यारितल्या आय आय एम सी या माध्यम क्षेत्रातल्या सर्वोच्च संस्थेची उभारणी बडनेरा इथं होत आहे. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव, संजय जाजू यांनी काल नागपूर इथं या संस्थेच्या बांधकामाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी माहिती प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत येणाऱ्या आकाशवाणी, दूरदर्शन, पत्र सूचना कार्यालय, केंद्रीय संचार ब्युरो कार्यालयांच्या प्रमुखांचीदेखील बैठक घेतली.

****

पुण्यातल्या बालरंगभूमी संमेलनाचा काल समारोप झाला. या समारोप सोहोळ्यात बालरंगभूमीवरील उल्लेखनीय कर्याबद्दल प्रतिभा मतकरी यांना बालरंगभूमी गौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. तीन दिवसांच्या या संमेलनात बालरंगभूमी परिषदेच्या पुण्यासह राज्यभरातल्या शाखांमधल्या बालकलावंत आणि दिव्यांग कलावंतांनी सादरीकरण केलं.

****

पुण्यात वाघोली इथं भरधाव डंपरनं चिरडल्यामुळे फुटपाथवर झोपलेल्या तीन जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले. डंपर चालकाविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

आयुर्वेदिक औषधाच्या नावाखाली भांगेच्या गोळयांची तस्करी करणाऱ्या एकाला ठाणे जिल्ह्यातल्या भाईंदर इथून उत्पादन शुल्क विभागाने अटक केली. जितेंद्र कामता असं या आरोपीचं नाव असून, त्याच्याकडून दोन लाखांहून अधिक रुपयांच्या भांगेच्या गोळ्यांचा साठा जप्त करण्यात आला. त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

बीड तालुक्यातल्या निराधारांना संजय गांधी, श्रावणबाळ योजने अंतर्गत नव्या लाभार्थ्यांचे अर्ज आता मंजूर झाले आहेत. आमदार संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली या संदर्भात बीड इथं झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

****

महिला क्रिकेटमध्ये एकदिवसीय सामन्यांत एका वर्षात सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम स्मृती मानधनानं नोंदवला आहे. काल वडोदरामध्ये वेस्ट इंडिज संघाबरोबर झालेल्या सामन्यात स्मृतीनं ९१ धावा केल्यामुळे तिनं या वर्षी केलेल्या धावांची संख्या एक हजार ६०२ झाली आहे. त्यामुळे स्मृतीनं दक्षिण आफ्रिकेच्या लॉरा वोलवार्टचा एक हजार ५९३ धावांचा विक्रम मोडला आहे.

****